सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 339 ठ. क्र. 394 दि. १८/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



उजनी ते सोलापूर या मार्गावर NTPC च्या माध्यमातून पाण्यासाठी जे पाईपलाईनचे काम होत आहे. त्याद्वारे सोलापूरासाठी पाणीपुरवठा घेण्याचे महापालिका प्रशासनानी व्यक्त केले आहे. जर या समांतर पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा घेण्याचे ठरल्यास मनपास कोणकोणती उपाय योजना करावे लागेल व त्यासाठी लागणारे तरतूद याबाबतची तपशीलवार टिप्पणी मा. आयुक्तांनी त्वरीत सादर करण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 332 ठ. क्र. 395
दि. 9/8/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सौ. सीमा सुरेश शिंदे, राहणार शिवाजी नगर, बाळे, सोलापूर यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखिची आहे. यांचे पतीची खाजगी नोकरी असून, त्यांचे उत्पन्न अत्यंत अल्प आहे. यांचा मुलगा श्रीवर्धन सुरेश शिंदे वय १५ वर्षे हा मतीमंद असून, सध्या त्याच्यावर दवाखान्यामध्ये औषधोपचार चालू आहेत. सध्या आपल्या मुलावर उपचार आर्थिक परिस्थिती हलाखिची असलेने, व्यवस्थित करु शकत नाही. उपचाराकरिता आतापर्यंत बराच मोठा खर्च झालेला असून, सध्याही मोठया प्रकरणात खर्च होत आहे. या बाबींचा सहानुभूमीपूर्वक विचार होवून त्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत महानगरपालिकेच्या वतीने देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 333 ठ. क्र. 396
दि. 29/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्री. जीवन राजू जाडकर रा. ब्लॉक नं. ६ प्रियदर्शनी हौसिंग सोसायटी सोलापूर यांची बहीण कु. मीरा राजू जाडकर हिला ताप थंडी चढउतार असल्यामुळे जवळच्या डॉक्टरांकडे तपासणी केले असता डेंग्यू हा आजार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी कु. मीरा राजू जाडकर हिला दवाखना खर्च व औषधोपचारासाठी र.रु. ३०,०००/- इतका खर्च होणार असून त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखिची आहे. तसेच त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने इतका खर्च करणे त्यांच्या कुवतीच्या बाहेर आहे. तरी कु. मीरा राजू जाडकर हिच्या आजारावर उपचार करण्यासाठी व पुढील औषधोपचारासाठी जास्तीत जास्त अर्थ सहाय्य देण्यासाठी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.336 ठ. क्र.396
दि. 9.8.2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



१४ एप्रिल २०१६ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती असल्याने ती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी जे महान कार्य केले आहे ते लोकांना सदैव प्रेरणादायी ठरण्यासाठी सोलापूर शहरातील आगमनानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर कोणत्या ठिकाणी गेले याची माहिती लोकांना व्हावी. म्हणून त्याठिकाणी ग्रेनाईटच्या शिलालेखावर माहिती कोरण्यात यावी. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित उत्कृष्ठ व्याख्यात यांचे व्याख्यान हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित करणेस व सदर सर्व कार्यक्रम करणेसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३३४ ठ. क्र. ३९८
दि. ९/८/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील रस्ता दुभाजकामध्ये शोभेची झाडे लावून शहराचे सौंदर्य वाढविणे स्मार्ट सिटी विकसित करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे यादृष्टीने सोलापूर रेल्वे स्टेशनचे समोरील बाजुस स्टेशन पोलीस चौकी ते रेल्वे स्टेशन इन गेट पर्यंत असलेल्या रस्त्यावरील दुभाजकात शोभेची झाडे लावून त्याची देखभाल करण्याचे काम जाई जुई प्रतिष्ठान सोलापूर हे करण्यास तयार असल्याबाबत त्यांनी पत्राव्दारे मागणी केली आहे. तरी जाई जुई प्रतिष्ठान सोलापूर यांच्या मागणीप्रमाणे सदर रस्ता दुभाजकात शोभेची झाडे लावून त्याचे संगोपन, देखभाल करण्याचे काम जाईजुई प्रतिष्ठान सोलापूर यांचेकडे सोपविण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३४६० क्र. ३१८
दि. १८/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



श्री. अभिजित यलदास वामने, वय २२, रहा. रमाबाई झोपडपट्ट बस डेपोच्या पाठीमागे, सोलापूर यांना ब्रेन टयुमर झालेला असून, ते गेल्या ७-८ वर्षापासून बेडवर पडून आहेत. ते मागासवर्गीय समाजाचे असून, त्यांचेवर उपचाराकरिता सुमारे ७-८ लाखाचा खर्च झालेला आहे. अजूनही मोठया प्रमाणावर उपचार करावे लागणार असून, खर्चही मोठया प्रमाणात येणार आहे. त्यांचे घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असनू, हा खर्च त्यांना झेपणार नाही. यास्तव पुढील औषधोपचाराकरिता महानगरपालिकेचे वतीने जास्तीत जास्त आर्थिक अनुदान देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका